CDLG070701

पोलीस कोठडीतील मृत्यूच्या घटना संदर्भात दंडाधिकारीय चौकशी अहवाल/तपास अहवाल राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास विहित मुदतीत पाठविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**

परिपत्रक क्र.एचआरसी-०४०७/प्र.क्र.६७/पोल-१४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः- १० जुलै, २००७.

**वाचा :-** शासन परिपत्रक, गृह विभाग, क्रमांकः-सीआयआय-०१८७/फेब्र-८१/पोल-१४, दि.९ जून, १९९८.

## परिपत्रक

पोलीस कोठडीत अथवा रखवालीत मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणांबाबत दंडाधिकारीय चौकशी अहवाल व गुन्हे अन्वेषण विभागाचा अहवाल राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली याना विहित मुदतीत पाठविण्याबाबतचे स्पष्ट आदेश संबंधितांना यापूर्वी देण्यात आले आहेत.

२. पोलीस कोठडीतील अथवा रखवालीतील मृत्यूबाबतच्या अशा घटनांमध्ये फौ.द.प्र.सं.१९७३ च्या कलम १७६ मधील तरतूदीनुसार दंडाधिकारीय चौकशी करणे बंधनकारक आहे. पोलीस महासंचालक यांचे परिपत्रक क्र.३२/३४/पो.क.मृ./८८, दि.१६.६.१९८९ अनुसार सदर दंडाधिकारीय चौकशीस सहकार्य करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना सूचित करण्यात आलेले आहे. तथापि उपरोक्त आदेशांचे पालन संबंधित प्राधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे होत नसल्याबाबत काही प्रकरणांत दिसून आले आहे. राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांनीही सदर अहवालाची पूर्तता विहित मुदतीत होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणली असून यासंदर्भात आयोगाने संबंधिताना सूचना देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

३. उपरोक्त बाब विचारात घेऊन पोलीस कोठडीत अथवा रखवालीत झालेल्या मृत्यू घटनांमध्ये दंडाधिकारीय चौकशी अहवाल व गुन्हयाचा तपास अहवाल राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना विहित वेळेत पाठविण्याची दक्षता घ्यावी तसेच सदर अहवालाच्या प्रती, आवश्यक त्या कागदपत्रासह शासनासही सादर करण्यात याव्यात.

उपरोक्त आदेशांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखाः-
आवक नं.:- DC 2363 ec
13 AUG 2007
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. नि. जि. जिल्हाधिकारी

DC 16/8 17/8

**( प्र. ता. गौड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.**

**प्रति,**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त